**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७४१/२०२५**
**शिवपार्वती साडी डेपो वि. मोरया कलेक्शन**
**निशाणी क्र.९ लगत**

**फिर्यादीचा पुढील सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्रीमती टी.एम.पाटणकर यांचेमार्फत सुरु–**

आता मला संचिकेवर दाखल माझे पुराव्याचे शपथपत्र दाखवण्यात आले. त्यास **निशाणी ९** देण्यात येत आहे. आता मला संचिकेवर दाखल धनादेश दाखवण्यात आला. तो मला आरोपीने दिलेला होता. सदर धनादेशास **निशाणी १७** देण्यात येते. सदरचा धनादेश मी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा फलटण येथे वटण्यासाठी भरला, परंतु सदरचा धनादेश हा दि.११.०३.२०२५ रोजी अनादरीत झाला, त्याचा बँकेचा मेमो मी दाखल केला आहे. सदर मेमोला **निशाणी १८** देण्यात येते. मी आरोपीस दुकानाच्या नावाने व स्वतःच्या नावाने धनादेशाच्या पैशाची मागणी करण्यासाठी दिनांक १९.०३.२०२५ रोजी रजिस्टर पोस्टाने नोटीसा पाठविल्या. त्याची स्थळप्रत मी दाखल केली आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर नोटीसींना **निशाणी १९ व २०** देण्यात येत आहे. सदर नोटीसा मी पोस्टाने पाठवल्या होत्या. त्यांच्या पावत्या मी दाखल केलेल्या आहेत. त्यांना **निशाणी २१ व २२** देण्यात येत आहेत. सदर नोटीसा आरोपीला मिळाल्याचे दोन ट्रॅक रिपोर्ट मी दाखल केले आहेत. त्यांना **निशाणी २३ व २४** देण्यात येत आहेत. मी दि.०६.०३.२०२५ रोजी आरोपीला बिल क्र.७२२, ७२३, ३६७७ अन्वये एकूण रक्कम ५४,७४९/– इतकी येणे बाकी असल्याचे पत्राने पोस्टाने कळविले होते. सदर पत्राची स्थळप्रत मी दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर पत्राला **निशाणी २५** देण्यात येत आहे. सदर पत्र पोस्टाने पाठविल्याची पावती दाखल केली आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येत आहे. सदर पत्र आरोपीला मिळाल्याचा ट्रॅक रिपोर्ट मी दाखल केला आहे. त्यास **निशाणी २७** देण्यात येत आहे.

**आरोपी व त्याचे वकिलांचा पुकारा केला असता गैरहजर. करीता, उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए.एस.साटोटे)

दि.०९.०६.२०२६ ३रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण